# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२३०/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मंदीप मारोती गोरडवार, मु. पुलखल, पो. कनेरी, ता.जि. गडचिरोली | सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, सिरोंचा, ता. सिरोंचा जि. गडचिरोली | संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, सिरोंचा, ता. सिरोंचा जि. गडचिरोली |

**सुनावणी दिनांक :- १७.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २५.०४.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : सदर प्रकरणी माहिती अर्जानुसार माहिती न देणाऱ्या व प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करावी. तसेच मागितलेली माहिती देण्याबाबत आदेशित करावे, अशी विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४.०१.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ११.०१.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१० ते आजपावेतो

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १)सामान्य नागरीक व पदाधिकारी यांनी ग्रामसेवक, विस्तार अधिकारी विरुध्द तक्रारीवर केलेल्या प्रशासकीय कार्यवाही आदेशाच्या सत्यप्रती, २) सामान्य नागरीक व

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

पदाधिकारी यांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या सत्यप्रती ३) सामान्य नागरीक व पदाधिकारी यांच्या तक्रार अर्जा कार्यवाही न करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्याचे नावाची यादी ४) तक्रार अर्जावर कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्याचे प्रशासकीय अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्याने पाठविले असल्यास त्या अहवालाच्या सत्यप्रती.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती सिरोंचा यांनी दिनांक २४.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, माहितीच्या अधिकार २००५ अंतर्गत मागणी केलेली माहिती निरंक असल्याने पुरविता येणार नाही. करीता आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे.

**४. प्रथम अपील –**

| | |
|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : ०३.०२.२०२२ |
| (२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : उपलब्ध नाही. |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : विहीत मुदतीत माहिती दिलेली नाही. |
| (४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही | : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. |

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री. व्हि.डी. बन्सोड व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, श्री. श्रीकृष्ण पेंदाम आयोगासमोर उपस्थित असून त्यांनी स्पष्ट केले की, अपिलार्थी यांचा दिनांक ०४.०१.२०२२ रोजीचा माहिती अर्ज कार्यालयास दिनांक ११.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.०१.२०२२ रोजी अर्जदार यांना माहिती निरंक असल्याने माहिती पुरविता येणार नाही, असे कळवून अर्ज निकाली काढण्यात आला होता. परंतु अर्जदार यांचा प्रथम अपील अर्ज पंचायत समिती सिरोंचा कार्यालयास प्राप्त झाला नसल्याने प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून आदेश पारीत करता आले नाही.

**६. निष्कर्ष –**

१. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.०१.२०२२ रोजी अपिलार्थीस वस्तुस्थिती कळविली आहे.
२. अपिलार्थी यांनी व्दितीय अपील अर्जासोबत दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, त्यावर पंचायत समिती सिरोंचा कार्यालयाचा आवक-जावक शाखेच्या सहिशिक्क्यानिशी पोहच दिसून येत नाही. तसेच सदर प्रथम अपील अर्ज पोस्टाने पाठविल्याबाबतची पोस्टाची पोहचपावती सुध्दा आढळून येत नाही. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे ते याबाबतचे अधिक स्पष्टीकरण देऊ शकलेले नाही. त्यामुळे प्राधिकरणाने केलेल्या युक्तीवादात सत्यता आढळून येते.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

३. अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केलेला नसल्यामुळे आयोगासमोर दाखल केलेला व्दितीय अपील अर्ज दखलपात्र ठरत नाही. त्यामुळे प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते.

**आदेश**

**वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.१२.२०२४**

जावक क्रमांक 771 दिनांक 14 FEB 2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर